॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
अहिल्यानगर ▪ सोमवार, दि. १३ एपिल २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ३२७ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

✻ **सुविचार** ✻
स्वर्ग आणि नरक
पृथ्वीवरच आहे.

## फोडणी

**राजू घुगरे,**
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### पोट-निवडणूक

लोकशाहीने धरलेय
घराणेशाहीचे बोट
उमेदवारीनेही राहीना
निवडणुकीचे पोट
तेच लोक पुढे येतात
प्रक्रियेला चिवडून
लुटपुटूच्या लढाईस
आले म्हणता निवडून

## SPOT NEWS

### शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार

● **मुंबई** – महाराष्ट्रात स्कूल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. तर आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कडक आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६'लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत सर्वसामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# चिरतरुण स्वर हरपला

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे ९२ व्या वर्षी निधन



● **मुंबई । वीरभूमी** –
आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांनी सात दशकांहून अधिक काळ रसिक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे आज मुंबईत निधन झाले. शनिवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आणि छातीत संसर्ग झाल्यामुळे दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती अधिकच खालावली आणि आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली.

शनिवारी संध्याकाळी आशाताईंना श्वास घेण्यास त्रास आणि अशक्तपणा जाणवू लागल्याने रुग्णालयात हलवण्यात आले होते. डॉक्टरांच्या विशेष पथकाद्वारे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ४ वाजता दादर येथील शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

आशा भोसले यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नव्हे, तर २० पेक्षा जास्त भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये १०,००० हून अधिक गाणी गायली आहेत. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी रोमँटिक गाणी, गझल, शास्त्रीय संगीत आणि 'दम मारो दम' सारखी पॉप गाणी गाऊन आपले अष्टपैलूत्व सिद्ध केले होते.

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांना गाण्याचा वारसा मिळाला. अवघ्या ९ व्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले, ज्यामुळे कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आणि लता दीदींवर आली. १९४३ मध्ये 'माझा बाळ' या मराठी चित्रपटातील 'चला चला नव बाळा' हे त्यांचे पहिले गाणे होते. १९४८ मध्ये 'चुनरिया' चित्रपटातील 'सावन आया' या गाण्याने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले.

सुरुवातीच्या काळात मोठ्या गायिकांकडे (उदा. लता मंगेशकर, गीता दत्त) उरलेली गाणी किंवा 'बी' ग्रेड चित्रपटांतील गाणी आशा ताईंच्या वाट्याला येत असत. ओ. पी. नय्यर यांनी आशा ताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखले. 'नया दौर' (१९५७) मधील 'मांग के साथ तुम्हारा' आणि 'उडे जब जब जुल्फें तेरी' या गाण्यांनी त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. त्या काळात त्यांनी शास्त्रीय संगीत, कव्वाली आणि रोमँटिक गाण्यांमध्ये आपला ठसा उमटवला.

आर. डी. बर्मन (पंचमदा) आणि आशा भोसले यांच्या जोडीने भारतीय संगीतात क्रांती घडवली. पाश्चात्त्य संगीताचा प्रभाव : 'दम मारो दम' (हरे रामा हरे कृष्णा), 'पिया तू अब तो आजा' (कारवाँ) यांसारख्या गाण्यांमुळे त्यांना 'पॉप क्वीन' ही नवी ओळख मिळाली. 'उमराव जान' (१९८१) मधील गझल गाऊन त्यांनी सिद्ध केले की, त्या केवळ पॉपच नाही तर अत्यंत गंभीर आणि शास्त्रीय ढंगाची गाणीही लीलया गाऊ शकतात. या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

वयाच्या साठीनंतरही आशा ताईंनी आपला आवाज तरुण ठेवला. रंगीला रे : १९९५ मध्ये ए. आर. रहमान यांच्या 'रंगीला' चित्रपटातील 'तनहा तनहा' आणि 'याई रे' गाण्यांनी त्यांनी नव्या पिढीलाही वेड लावले. इंडिपोप आणि जागतिक सहयोग : त्यांनी 'जानम समझा करो' सारखे पॉप अल्बम्स काढले आणि ब्रिटिश बँड 'कॉर्ड रेड' तसेच बॉब जॉर्ज यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम केले.

## इराण-अमेरिका शांतता चर्चा फिस्कटली

● **इस्लामाबाद** –
गेल्या ४० दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न तूर्तास अपयशी ठरले आहेत. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे तब्बल २१ तास चाललेल्या उच्चस्तरीय चर्चेनंतर कोणताही ठोस करार होऊ शकला नाही, अशी माहिती अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी दिली आहे.

मध्य-पूर्वेतील तणाव आणि 'होर्मुझची सामुद्रधुनी' (डींरळीं ेष कीीर्ाू) उघडण्याच्या मुद्द्यावर मार्ग काढण्यासाठी दोन्ही देशांचे प्रतिनिधी आमनेसामने बसले होते. रविवारी पहाटे पत्रकार परिषदेत बोलताना जेडी व्हान्स म्हणाले की, आम्ही चर्चेसाठी आमचा 'अंतिम आणि सर्वोत्तम' प्रस्ताव दिला होता, परंतु इराणने अमेरिकेच्या अटी मान्य करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आम्ही कोणत्याही कराराशिवाय वॉशिंग्टनला परतत आहोत.

मिळालेल्या माहितीनुसार, चर्चा प्रामुख्याने खालील तीन मुद्द्यांवर अडकली: १. अणुकार्यक्रम : इराणने अण्वस्त्रे बनवणार नाही, याचे लेखी आश्वासन द्यावे ही अमेरिकेची मुख्य अट होती. २. होर्मुझची सामुद्रधुनी : जागतिक तेल व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा सागरी मार्ग पूर्णपणे खुला करण्याबाबत इराणने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. ३. प्रतिबंध : इराणने त्यांच्यावर लादलेले निर्बंध तातडीने हटवण्याची मागणी केली होती, जी अमेरिकेने फेटाळून लावली.

जेडी व्हान्स यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, करार न होणे ही अमेरिकेपेक्षा इराणसाठी अधिक वाईट बातमी आहे. आम्ही आमच्या 'रेड लाईन्स' स्पष्ट केल्या आहेत आणि त्याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेवर 'अवाजवी मागण्या' केल्याचा आरोप केला आहे. इराणने म्हटले आहे की, तांत्रिक स्तरावर चर्चा सुरूच राहील, मात्र अमेरिकेने आपली भूमिका लवचिक ठेवणे आवश्यक आहे.

## दर घसरल्याने कांदा उत्पादक संकटात

● **नाशिक । वीरभूमी** –
राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. लाल कांद्यानंतर आता नव्याने बाजारात दाखल होत असलेल्या उन्हाळी कांद्याच्या दरातही मोठी घसरण झाली आहे. लासलगावसारख्या आशियातील सर्वात मोठ्या कांदा बाजार समितीत कांद्याला अवघे ८ ते १२ रुपये किलो भाव मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना लागवडीसाठी केलेला खर्च वसूल करणेही कठीण झाले आहे. या परिस्थितीमुळे बळीराजाच्या आर्थिक अडचणीत मोठी भर पडली आहे.

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा थेट परिणाम भारताच्या कांदा निर्यातीवर झाला आहे. आखाती देशांमधील मागणी घटल्याने व्यापाऱ्यांच्या गोदामांमध्ये मोठा साठा पडून आहे. तसेच या युद्धामुळे जागतिक स्तरावर कंटेनरच्या भाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. एकेकाळी ६०० डॉलरमध्ये उपलब्ध होणारा कंटेनर आता ६,५०० डॉलरपर्यंत महागला आहे, ज्यामुळे निर्यातीचे गणितच बिघडले आहे.

बाजारात आता मोठ्या प्रमाणात नवीन उन्हाळी कांदा दाखल होत आहे. तर दुसरीकडे, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील कांदा शेजारील राज्यांमध्ये स्वस्त दरात विक्रीसाठी उपलब्ध असल्याने महाराष्ट्रातील कांद्याला मागणी कमी झाली आहे. त्यासोबतच नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत केल्या जाणा-या खरेदीचे उद्दिष्ट यंदा ५ लाख मॅट्रिक टनावरून थेट २ लाख मॅट्रिक टनावर आणण्यात आले आहे, त्यामुळे बाजारातील अतिरिक्त साठ्यावर नियंत्रण मिळवणे कठीण झाले आहे. वाशी एपीएमसी मार्केटमध्ये शनिवारी कांद्याचे घाऊक दर ८ ते १२ रुपयांच्या दरम्यान नोंदवले गेले.

# अहिल्यानगरमध्ये महिला बचत गटांची 'लोकल टू ग्लोबल' भरारी..!

## ३५३ कोटींचे विक्रमी कर्जवाटप । सक्षमीकरणाचा नवा आदर्श

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
केवळ बचतीपुरती मर्यादित न राहता, जिल्ह्यातील बचत गटांची चळवळ आता परिवर्तनाचे प्रभावी साधन बनली आहे. जिल्ह्यात सध्या ३० हजार ११२ बचत गट सक्रिय असून, त्यांच्याशी ३ लाख १५ हजारांहून अधिक महिला जोडल्या गेल्या आहेत. या गटांना बँकांशी जोडून १६८ कोटी २० लाख रुपयांच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असताना, प्रत्यक्षात तब्बल ३५३ कोटी ०९ लाख रुपयांचे विक्रमी कर्जवाटप करण्यात आले आहे. या भक्कम आर्थिक पाठबळामुळे महिलांनी आत्मनिर्भरतेची नवी पहाट अनुभवत 'लोकल टू ग्लोबल' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि महिला व बाल विकास विभाग यांच्या समन्वयातून अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला स्वयं सहाय्यता बचत गटांनी सक्षमीकरणाची ही दमदार भरारी घेतली आहे.

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लखपती दीदी' उपक्रमातही जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी १ लाख ८० हजार ४४४ महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी १ लाख ३७ हजार २३४ महिलांनी हा टप्पा यशस्वीपणे गाठला आहे.

या भांडवलाच्या बळावर आणि शासनाच्या प्रशिक्षण सुविधांच्या मदतीने महिलांनी उद्योगनिर्मितीच्या क्षेत्रात भक्कम पाऊल टाकले आहे. मसाले, पापड, लोणची, बेकरी उत्पादने, हस्तकला, मेणबत्त्या आणि रेडीमेड कपडे यांसह दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व भाजीपाला उत्पादन अशा शेतीपूरक व्यवसायातही महिलांनी मोठी झेप घेतली आहे. महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आणि ग्रामसंघांच्या माध्यमातून सामूहिक खरेदी-विक्री तसेच कृषी सेवा केंद्रांची उभारणी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना दिली जात आहे.

दर्जेदार उत्पादन, स्थानिक चव आणि आकर्षक पॅकेजिंगच्या जोरावर महिलांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळत आहे. यासाठी जिल्हास्तरावर प्रदर्शने आणि मेळावे आयोजित केले जात असून, डिजिटल तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर केला जात आहे. उमेद अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या 'उमेद मार्ट' या ई-व्यापार प्लॅटफॉर्मवर जिल्ह्यातील सुमारे १८० उत्पादने ऑनलाईन विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. समाजमाध्यमांच्या माध्यमातून ही उत्पादने राज्याबाहेरील तसेच देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत असून, विक्रीत लक्षणीय वाढ होत आहे.

या प्रक्रियेतून स्थानिक पातळीवर अनेक यशस्वी उद्योजिका पुढे आल्या



आहेत. अहिल्यानगर तालुक्यातील मीरा बेरड (स्वामी समर्थ गट), संगमनेरच्या शोभना सोनावणे (माई गट) आणि ज्योती संस्कर (मी उद्योजिका), पारनेरच्या शिल्पा बेलोटे (राधिका गट), श्रीगोंद्याच्या शीतल गवते, नगरच्या विनया मुळे (श्रीकृष्ण गट) व अश्विनी कोळपकर, श्रीरामपूरच्या ज्योती जगताप व साक्षी आघाडे (साई समृद्धी) तसेच अकोले येथील शीला इदे (संधान गट) यांनी आपली उत्पादने 'ब्रँड' म्हणून विकसित करत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या आर्थिक प्रगतीमुळे पूर्वी कुटुंबात दुय्यम स्थान असलेल्या महिला आज निर्णयक्षम आणि नेतृत्वक्षम नागरिक म्हणून पुढे येत आहेत. उत्पन्नात वाढ झाल्याने मुलांच्या शिक्षणाला चालना मिळाली असून, कुटुंबाचे आरोग्य आणि जीवनमानही सुधारले आहे. 'स्वतः सक्षम व्हा आणि समाजालाही सक्षम करा' हा संदेश देत महिला बचत गटांनी निर्माण केलेला हा आदर्श जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावत आहे.

## SPOT NEWS

### तालुक्यातून आणखी एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता; अपहरणाचा संशय

● **पाथर्डी I वीरभूमी-**

तालुक्यातील रुपनरवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी संशयास्पदरीत्या बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली असून, अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.



या प्रकरणी संबंधित मुलीच्या पालकांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी दुपारी दोनच्या सुमारास घरातून कामानिमित्त बाहेर गेली होती. दरम्यान ती परत न आल्याने कुटुंबियांनी तिचा परिसरात सर्वत्र शोध घेतला परंतु ती सापडली नाही. त्यानंतर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली असून दरम्यान अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलगी पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत. तालुक्यातून अल्पवयीन मुलीला फूस लावून किंवा इतर कारणाने पळवून नेण्याचे किंवा अपहरण करण्याचे ही दुसरी घटना असून दोन तीन दिवसापूर्वी निपाणी जळगाव येथील मुलगी ही बेपत्ता झाली होती आता पुन्हा अशीच घटना घडल्याने तालुक्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# शेवगावात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारणार

## नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने ठराव मंजूर I नगरसेविका आशा बुलबुले यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

● **शेवगाव I वीरभूमी -**

शहरातील नवीन बाजारतळ येथील भाजी मंडई परिसरात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शेवगाव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. या निर्णयामुळे शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर मार्गी लागली असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठे प्रतीकात्मक महत्त्व असलेले स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



नवीन बाजारतळ येथील भाजी मंडई परिसरात हे स्मारक उभारावे, यासाठी नगरसेविका आशा खंडेराव बुलबुले यांनी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला होता. यासाठी त्यांनी विविध बैठका घेतल्या, प्रशासनाशी पत्रव्यवहार केला तसेच नगर परिषद स्तरावर विषय प्रभावीपणे मांडला. अखेर सर्वसाधारण सभेत ठराव मांडण्यात येऊन तो एकमताने मंजूर करण्यात आला.

या स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. पुतळा उभारणीसाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे सांगण्यात आले असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शहरात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारावे, ही मागणी अनेक वर्षांपासून होत होती. सामाजिक समता, स्त्री शिक्षण आणि शेतकरी हक्कांसाठी आयुष्य वेचलेल्या या महापुरुषांच्या कार्याचा गौरव व्हावा, यासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. नगर परिषद स्तरावरही या विषयावर चर्चा होऊन पाठपुरावा करण्यात आला होता.

नगरसेविका आशा बुलबुले म्हणाल्या की, शहरातील सर्वसामान्यांची भावना लक्षात घेऊन हा ठराव मांडण्यात आला. सभागृहाने एकमताने ठराव मंजूर केल्याबद्दल अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व नगरसेवकांचे त्यांनी आभार मानले. तसेच आमदार मोनिका राजळे यांनी दिलेले निधीचे आश्वासन लवकरच प्रत्यक्षात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ठराव मंजूर झाल्यानंतर शहरात समाधानाचे वातावरण असून, हे भव्य स्मारक उभारल्यानंतर नवीन बाजारतळातील मंडईचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित होणार आहे. तसेच भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणारे हे स्मारक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महात्मा ज्योतिबा फुले पुतळा कृती समितीचे अध्यक्ष खंडु बुलबुले, शिवाजी आधट, बाळासाहेब शिंत्रे, ॲड. कारभारी गलांडे, पांडुरंग लिंगे, दीपक नांगरे, अनिकेत डाके, शुभम नांगरे, सचिन नांगरे, सोपान आधट, विशाल आधट, रोहित नांगरे, सचिन डाके, लक्ष्मण लिंगे, सागर आधट, प्रजोत डाके, राहुल नांगरे, आकाश डाके, अक्षय भडके, ओमकार सुसे, हरी नांगरे, देवीदास डाके आदी कार्यकर्ते यासाठी प्रयत्नशील आहेत.

# आयआयटी दिल्लीत समता इंटरनॅशनल स्कूलचा तिहेरी ऐतिहासिक विजय; विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर दमदार छाप

● **कोपरगाव I वीरभूमी-**

आयआयटी दिल्ली येथे पार पडलेल्या १० व्या राष्ट्रीय स्तरावरील रोबोटिक्स व कोडिंग चॅम्पियनशिपमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत तिहेरी विजयाची नोंद केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकले असून विद्यार्थ्यांच्या कौशल्याची देशभर दखल घेतली जात आहे.




स्पर्धेतील कोडिंग हॅकेथॉन प्रकारात प्रज्ञेश सानप, शार्विल गिरवालकर, अवनीश सावला, अनुरूप बजाज, शौनक जोशी व बनित खुराना या विद्यार्थ्यांनी बुद्धिमत्ता, नवकल्पना आणि संघभावनेच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत २० हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळवले. याचबरोबर सॉकर रोबोटिक्स गटात 'सर्किट स्ट्रायकर' संघाने उत्कृष्ट खेळ सादर करत राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. या संघात इयत्ता आठवीतील ईशान कोयटे व रुद्र राठोड यांचा समावेश होता. विशेष म्हणजे या संघाला सर्वोत्तम अभियांत्रिकी डिझाइनसाठी मानाचा 'टेकफ्लुएंसर वॉर्ड'ही मिळाला.

तसेच लाईन फॉलो रोबोटिक्स स्पर्धेत इयत्ता नववीतील सुयश शिंदे याने अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन करत राष्ट्रीय विजेतेपदासह 'टेकफ्लुएंसर वॉर्ड' पटकावून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

या सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षक उदय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामागे शाळेचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची प्रेरणा, कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती कोयटे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राचार्य समीर अत्तार यांचे प्रभावी मार्गदर्शन तसेच शिक्षकवर्गाचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यांचा मोठा वाटा आहे.

या यशाबद्दल कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे म्हणाल्या, हे यश विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि नवकल्पनाशील विचारांचे फलित आहे. आधुनिक शिक्षणपद्धतीत तांत्रिक कौशल्य व प्रत्यक्ष अनुभवाला दिलेले प्राधान्य आज फलदायी ठरले आहे.

समता इंटरनॅशनल स्कूलच्या या तिहेरी ऐतिहासिक विजयाने केवळ राष्ट्रीय स्तरावर ठोस ओळख निर्माण केली नाही, तर तंत्रज्ञान क्षेत्रातील भविष्यातील नेतृत्वाची क्षमता देखील स्पष्ट झाली आहे.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर 'बुगेवाडी'चा सुपुत्र बनला कर सहाय्यक

● **पारनेर I वीरभूमी-**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आणि अपयशाच्या अनेक लाटा पचवत, पारनेर तालुक्यातील बुगेवाडी येथील प्रवीण दत्तात्रय शेळके यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्यांची कर सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल संभाजीनगर मित्र मंडळाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सोहळा सामाजिक प्रेरणेचा एक नवा आदर्श ठरला आहे.या सत्कार समारंभास युवा उद्योजक मंगेश दाते उद्योजक राजेंद्र औटी नियाज राजे, शेटे महाराज, दत्तात्रय शेळके, सुनील गाडगे, महेश ठुबे, किरण कुबडे, रियाज राजे, रमिज राजे, कस्तुरलाल सोनवणे, निलेश सोनवणे, इम्रान शेख, आवेज राजे, रेहान राजे, जुनैद राजे आणि दिपक शेळके यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रवीणच्या संघर्षाचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रवीण शेळके यांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत खडतर पण प्रेरणादायी राहिला आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण बुगेवाडीतील जिल्हा परिषद शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण सेनापती बापट विद्यालय, पारनेर येथे पूर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील गेनबा सोपानराव मोझे इंजिनिअरिंग कॉलेज, वाघोली येथून अभियांत्रिकीची पदवी संपादन केली. २०१६ साली त्यांनी पुण्यातील 'युनिक अकॅडमी'तून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली. तेव्हापासून त्यांचा संघर्षाचा काळ सुरू झाला. प्रत्येक वर्षी ते पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेसाठी पात्र व्हायचे, परंतु अंतिम निकालात काही गुणांनी त्यांचे यश हुकायचे.

माझे अंतिम निवडीचे स्वप्न भंगले होते. तो काळ अत्यंत मानसिक दडपणाचा होता. यश नेहमी हुलकावणी देत होते, पण आई-वडील आणि बहिणीच्या भक्कम पाठिंब्यामुळे मी पुन्हा उभा राहिलो, अशा भावना प्रवीणने सत्कारप्रसंगी व्यक्त केल्या.

प्रवीण यांनी हार न मानता आपला अभ्यास सुरूच ठेवला. फेब्रुवारी २०२५ मध्ये त्यांनी पूर्व परीक्षा दिली, त्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये मुख्य परीक्षेत यश मिळवले. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेली 'स्किल टेस्ट' यशस्वीपणे पार केल्यानंतर,६ एप्रिल २०२६ रोजी जाहीर झालेल्या अंतिम निवड यादीत त्यांचे नाव झळकले आणि त्यांची 'कर सहाय्यक' पदी निवड झाली. प्रवीण शेळके यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ ठरणारे आहे. कोणत्याही मोठ्या संकटावर जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मात करता येते, हेच प्रवीणने सिद्ध केले आहे. संभाजीनगर मित्र मंडळाने त्यांच्या या यशाची दखल घेऊन सत्कार केला.

# फुले यांच्या जीवनकार्याचा परिचय विविध उपक्रमाद्वारे नवीन पिढीला अवगत करावा

## नगराध्यक्ष अभय आव्हाड I पाथर्डीत महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

● **पाथर्डी I वीरभूमी-**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी महोत्सवी वर्ष सुरू असून यानिमित्त शहरातील समविचारी कार्यकर्त्यांनी वर्षभर विविध उपक्रम राबवून महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा परिचय नवीन पिढीला अवगत करावा, असे आवाहन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

कसबा विभागातील संत सावता माळी चौकामध्ये संतश्रेष्ठ सावता महाराज मंदिर ट्रस्ट, महात्मा फुले ट्रस्ट, क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी सावता माळी मंदिरामध्ये महात्मा फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले संत सावता माळी व विठ्ठल रखुमाईचे पूजन करून जयंती उत्सवाचा कार्यक्रम सुरू झाला. यावेळी मोहन सुडके महाराज, मोहटा देवस्थानचे विश्वस्त अशोक दहिफळे, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नंदकुमार शेळके ज्येष्ठ शायर व साहित्यिक हुमायून आतार, राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष योगेश रासने, नगरसेवक देवा पवार, बंडूभाऊ बोरुडे, सुभाष बोरुडे, अनिल बोरुडे, मनीषा उदमले, मंगल सोनटक्के, बंडूभाऊ देशमुख, महेंद्र राजगुरू, डॉ दिलीप सरसे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुंदरदास कांबळे, आजिनाथ डोमकावळे, राजेंद्र दुधाळ, गणेश तात्या सोनटक्के प्रतिक नांगरे रमेश गोरे आदींसह समाजातील सर्व संघटनांचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कवी राजेंद्र उदारे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. विविध वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा भाषणातून घेतला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष आव्हाड म्हणाले, नव्या पिढीला महापुरुषांची चरित्रे, त्यांचे योगदान व कार्य कळायला हवे. देश महासत्ता बनवायचा असेल तर तरुणाईने राष्ट्रपुरुषांची चरित्र ज्येष्ठ समाजसेवकांचे कार्य अभ्यासून त्यातून प्रेरणा घ्यावी. आपल्या परिसरातच भरपूर आदर्श आहेत. त्यांना आपण नव्या पिढी पुढे आदर्श म्हणून सादर करण्यात कमी पडतो. प्रत्येक समाजातील ज्येष्ठ विचारवंत व कार्यकर्त्यांनी इतिहासाचे वस्तुनिष्ठ रूप मांडावे. महात्मा फुले यांचे योगदान परिवर्तनाच्या चळवळीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले असून शिक्षणाचा प्रसार, समतेचा प्रसार, सर्वसामान्यांना जगण्याचा आत्मविश्वास देण्यासाठीचे त्यांचे कार्य म्हणजे ईश्वराच्या कार्यासारखे ठरते. पालिकेच्या माध्यमातून सुद्धा महात्मा फुले यांच्या कार्याचे सतत स्मरण राहावे म्हणून सर्व समाजाला विश्वासात घेऊन वैशिष्ट्यपूर्ण काम करू.




महात्मा फुले जयंतीनिमित्त सायंकाळी शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमुळे शहरात चांगली वातावरण निर्मिती होऊन सर्वच समाज बांधव एकत्र येता जमले समाजाचा उत्साह सुद्धा चांगला होता सर्व धर्मीय नागरिक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले मिरवणुकीचे स्वागत कार्यकर्त्यांकडून ठिकठिकाणी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ कार्यकर्ते अरविंद सोनटक्के, सूत्रसंचालन सुखदेव मर्दाने तर आभार बाळासाहेब सोनटक्के यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## आळेकर व भोंडवे यांचा राजमाता जिजाऊ पतसंस्थेकडून सन्मान

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा येथील प्रगतशील शेतकरी, तसेच कृषी, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्य करणारे आणि सहकार क्षेत्रातील दांडगा अनुभव असलेले इंदिरा नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष एकनाथराव आळेकर यांची सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा राजमाता जिजाऊ पतसंस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच वांगदरी येथील मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल रमेश भोंडवे यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित या सत्कार समारंभात संस्थेचे चेअरमन प्रकाश निंभोरे, व्हा. चेअरमन बाळासाहेब भोर, संचालक माधव बनसुडे, तसेच संस्थेचे मॅनेजर संजय सोनवणे आणि अ‍ॅड. महेश क्षीरसागर यांच्या हस्ते दोन्ही मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे संचालक, सभासद आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही मान्यवरांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

## आनंदराव आढाव यांचे निधन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव येथील स्वर–संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गुरु आणि तपस्वी व्यक्तिमत्त्व आनंदराव (आण्णा) केशवराव आढाव यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रावर शोककळा पसरली असून कोपरगावच्या सांस्कृतिक जीवनातील एक दीपस्तंभ हरपला आहे. बालपणी दृष्टी गमावूनही आण्णांनी संगीताची साधना अखंड सुरू ठेवत आयुष्य संगीताला वाहिले. सन १९५८ मध्ये त्यांनी कोपरगाव येथे 'आनंद संगीत विद्यालय'ची स्थापना करून हजारो विद्यार्थ्यांना संगीताचे धडे दिले. शास्त्रीय गायनासह हार्मोनियम, तबला, बासरी आदी वाद्यांमध्ये त्यांनी प्रावीण्य मिळवले होते. आण्णांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ यांसह अनेक संतांच्या सुमारे दोन हजार अभंगांना चाल दिली. श्रीसाई संस्थानच्या उत्सवात त्यांनी अनेकदा गायन सेवा दिली होती. भारतरत्न भीमसेन जोशी, मन्नाडे, आशा भोसले यांसारख्या दिग्गज कलाकारांचा त्यांना सहवास लाभला होता. त्यांच्या गायलेल्या गझला आकाशवाणीवर प्रसारित झालेल्या आहेत. कोपरगावात 'पहाट पाडवा' या भाव–भक्तिगीत परंपरेची सुरुवात करून त्यांनी सांस्कृतिक परंपरा जपली. संगीतासोबतच त्यांनी समाजात शिस्त, संस्कार आणि परंपरेचे महत्त्व रुजवले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते संगीत साधनेत रमलेले होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, शिष्यवर्ग आणि मोठा चाहतावर्ग आहे. आण्णांचे कार्य, विचार आणि संगीत परंपरा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# कर्डिले साहेबांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करा

### डॉ. सुजय विखे पाटील । उंबरे व ब्राम्हणी गणातील कार्यकर्त्यांची बैठक

**● राहुरी । वीरभूमी–**

राहुरी–नगर–पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक ही स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्याला आणि त्यांनी निर्माण केलेल्या विश्वासाला न्याय देण्याची संधी आहे, असे भावनिक प्रतिपादन डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी केले. उंबरे व ब्राम्हणी गणातील कार्यकर्त्यांच्या भव्य बैठकीत बोलताना त्यांनी अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करत सर्व घटकांनी एकजुटीने विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्धार व्यक्त केला.



राहुरी–नगर–पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे माहितीचे अधिकृत उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारात राहुरी तालुक्यातील उंबरे व ब्राह्मणी गणातील कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम तसेच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

सभेच्या सुरुवातीला डॉ. विखे पाटील यांनी सर्व उपस्थितांच्या वतीने विविध स्तरावर योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. विशेषतः तनपुरे परिवाराच्या भूमिकेचे कौतुक करत ते म्हणाले की, माजीमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेला निर्णय हा माणुसकी, संस्कार आणि राजकीय परिपक्वतेचे उदाहरण आहे. एवढा मोठा त्याग करणे सोपे नसते. तसेच, या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेकांनी एकत्र येत दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. राजकारणात सर्वसमावेशकता अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही गटाच्या व्यक्तीची अवहेलना न करता एकजुटीने काम करणे हीच खरी ताकद आहे, असा संदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक एकत्रितपणे लढवली जात असून, मतदारसंघाच्या उज्वल भविष्यासाठी ही शेवटची संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. आगामी काळात मतदारसंघाची पुनर्रचना होणार असल्याने ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी राहुरी तालुक्यातील उबाटा गटाचे तालुकाप्रमुख सचिन म्हसे यांनी डॉ. विखे पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. या प्रवेशामुळे महायुतीची ताकद आणखी वाढले आहे

बैठकीत संघटन बळकट करण्यावर विशेष भर देत विकासाच्या मुद्द्यांवर जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी, येत्या २३ तारखेला होणाऱ्या मतदानात भारतीय जनता पार्टी व महायुतीला बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.

## टाकळीमानूर येथे क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



**● पाथर्डी । वीरभूमी–**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवार दि. ११ एप्रिल रोजी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य देविदास सोनटक्के यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमधून कु. आरती अमोल ढाकणे हिने आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या कार्याचा आणि जीवनपटाचा प्रभावी आढावा सादर केला. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल प्राचार्यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्याम गुंजकर व एकनाथ आव्हाड यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानवंत होऊन किर्तीवंत व्हा असा मोलाचा संदेश देत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## महात्मा फुलेंचे विचार क्रांतीकारक

### सचिन झगडे । महादजी शिंदे विद्यालयात जयंती उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलदीप निंबाळकर व सुशिला निंबाळकर यांनी विद्यालयातील गरजू ४० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी मनोगत व्यक्त करताना महात्मा फुले यांचे विचार क्रांतीकारक असल्याचे सांगितले. समाजाने धार्मिक व मानसिक गुलामगिरीतून बाहेर पडून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा आणि महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत, असे त्यांनी आवाहन केले.



### निंबाळकर कुटुंबाकडून ४० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले

महात्मा फुले जयंती तसेच मुलगा शिवराज यांच्या वाढदिवसानिमित्त कुलदीप निंबाळकर व सुशिला निंबाळकर यांनी विद्यालयातील गरजू ४० विद्यार्थ्यांना सुमारे १५ हजार रुपये किमतीच्या शालेय बॅगचे वितरण केले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी निंबाळकर कुटुंबाचे आभार मानले. तसेच श्री. व सौ. निंबाळकर यांचा सन्मान विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सुनिता काकडे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलाशिक्षक शरद शिरसाट यांनी केले. सूत्रसंचालन सुधीर साबळे यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य शहाजी एकाड यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गौतम पॉलिटेक्निकच्या ११८ विद्यार्थ्यांची निकालापूर्वीच नामांकित कंपन्यांमध्ये नियुक्ती

**● कोपरगाव । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये दडलेली गुणवत्ता ही एखाद्या खाणीतल्या हिर्यासारखी अमूल्य असते परंतु योग्य संधी आणि आधुनिक प्रशिक्षणाच्या अभावी अनेकदा अज्ञात राहते. मात्र जेव्हा या गुणांना योग्य दिशा, सक्षम मार्गदर्शन आणि अत्याधुनिक शिक्षणाची जोड मिळते, तेव्हा हेच विद्यार्थी आपल्या कर्तृत्वाने यशाचे नवे शिखर गाठतात हेच कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले असून आहे. या संस्थेतील तब्बल ११८ विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच या विद्यार्थ्यांच्या हाती नियुक्तीपत्रे सुपूर्द करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य वासिम शेख यांनी दिली आहे.




टाटा मोटर्ससह बड्या कंपन्यांचा समावेश असलेल्या या मेगा प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ऑटोमोबाईल आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने बॉश चासिस प्रायव्हेट लिमिटेड, टाटा मोटर्स लिमिटेड, किर्लोस्कर न्युमॅटिक्स लिमिटेड, जॉन डिअर ट्रॅक्टर्स, धूत ट्रान्समिशन यांसारख्या जागतिक स्तरावर नावाजलेल्या कंपन्यांमध्ये या ११८ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड झाली आहे. संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने ज्ञान, कौशल्य आणि संस्कार यांचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला यशाची नवी दिशा देत आहे. ११८ विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच नोकरीच्या संधी उपलब्ध होणे हे विद्यार्थ्यांच्या चिकाटी, मेहनत आणि जिद्दीने केलेल्या कष्टांचे फळ आणि संस्थेच्या दर्जेदार शिक्षणपद्धतीचे तेजस्वी प्रतिबिंब आहे.

प्रगत वर्कशॉप आणि मार्गदर्शनाची जोड या यशाबद्दल माहिती देताना प्राचार्य प्रा. वासीम शेख आणि प्लेसमेंट अधिकारी प्रा. कैलास भोसले यांनी सांगितले की, महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर आणि तेथील अद्ययावत सोयी–सुविधांनी युक्त वर्कशॉप विभाग, सुसज्ज प्रयोगशाळा यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ इंजिनिअरिंगचे शिक्षणच दिले जात नाही, तर त्यांना उद्योगांच्या गरजेनुसार तयार केले जाते. याच मेहनतीचे फळ म्हणून आज येथील विद्यार्थी शासकीय नोकरीसह मोठ्या खासगी कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार अशोकराव काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, सचिव सौ.चैतालीताई काळे, इन्स्पेक्टर प्रा.नारायण बारे तसेच संस्थेचे कार्यालयीन अधीक्षक अण्णासाहेब बढे व सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

> ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा देऊन त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवणे हा आमच्या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या ११८ विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच मिळवलेली नोकरी हे त्यांच्या मेहनतीचे व संस्थेने दिलेल्या दर्जेदार शिक्षणाची, योग्य मार्गदर्शनाची आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची साक्ष आहे. आपल्या पालकांनी पाहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितपणे प्रेरणादायी ठरेल असा विश्वास आहे.
>
> **– सौ. चैतालीताई काळे**, सचिव

# मळगंगा देवीच्या घागर मिरवणुकीसाठी लाखोंची गर्दी

## निघोज येथे उत्साहात पार पडली परंपरा । यात्रा, कुस्ती हगामे आणि विविध कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत

**● निघोज । वीरभूमी–**
राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या घागर दर्शनासाठी लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. शुक्रवारी रात्री साधारण ११ वाजता देवीच्या हेमाडपंथी बारवेत श्रींचे दर्शन झाले. त्यानंतर मध्यरात्री मानकऱ्यांच्या हस्ते घागरीची महापूजा करण्यात आली.

यानंतर शनिवारी सकाळी ७ वाजता सवाद्य घागर मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविकांनी माता मळगंगा देवीच्या जयजयकार घोषणांनी परिसर दणाणून सोडला. हेमाडपंथी बारव ते मंदिर आणि पुन्हा बारव येथे घागरीचे विसर्जन करण्यात आले.

मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी भाविकांनी घागरीवर पुष्पवृष्टी केली. मळगंगा मंदिर आणि ग्रामपंचायत चौकात ड्रोनच्या माध्यमातूनही पुष्पवृष्टी करण्यात आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यानंतर पुजारी म्हणून मान असलेल्या गायखे कुटुंबातील सवाष्णींनी घागरीचे औक्षण केले.

फक्त ३०० मीटर अंतराची ही मिरवणूक पूर्ण होण्यासाठी तब्बल दोन तास लागले. शनिवार, दि. ११ रोजी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या. दुपारी ४ वाजता छबिण्याची मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक कुंडावर पोहोचताच तेथील यात्रा सुरू झाली. काठी शिखराला लागल्यानंतर कुंडाची यात्रा सुरू होते व ती दोन दिवस चालते.

या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे खेळणी, मिठाई, पाळणे तसेच शेतीसाठी लागणारे साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. महिला मोठ्या प्रमाणात खरेदी करून यात्रेचा आनंद घेतात.

रविवार, दि. १२ रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत कुस्ती हगाम्याचे आयोजन करण्यात आले असून याच हगाम्याने यात्रेची सांगता होते. रात्री गावात किरणकुमार ढवळपुरीकर यांच्या लोकनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.





सोमवार, दि. १३ रोजी शहाकादरी बाबांचा उरुस होणार आहे. तसेच मंगळवार, दि. १४ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघ, निघोज व मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहेत.

## जायनावाडीत पेसा कायदा मार्गदर्शन शिबिर उत्साहात

**● अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील जायनावाडी येथे पेसा कायदा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला तालुका पेसा व्यवस्थापक बन्या बापू सहाणे तसेच स्वच्छ भारत समूह समन्वयक अशोक कडलग यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले.



२४ डिसेंबर १९९६ रोजी लागू झालेला पेसा कायदा हा एक ऐतिहासिक कायदा असून, तो भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी समुदायांना स्वशासनाचे अधिकार प्रदान करतो. या कायद्याद्वारे ग्रामसभेला केंद्रस्थानी ठेवून जमीन, पाणी, वनसंपदा आणि स्थानिक संस्कृतीचे संरक्षण करण्याचे अधिकार आदिवासींना दिले आहेत.

यावेळी पेसा कायदा तसेच वनहक्क कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामसभेचे वैधानिक अधिकार व जबाबदाऱ्या, वनहक्क दावे सादर करण्याची प्रक्रिया, अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांचे हक्क, तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. उपस्थितांच्या शंकांचे निरसन करून प्रत्यक्ष मार्गदर्शनही करण्यात आले.

गावागावात पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे, असे मत व्यक्त करण्यात आले. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावागावात सार्वजनिक तसेच वैयक्तिक शौचालये उभारली पाहिजेत, यावरही भर देण्यात आला. शासनाकडून उपलब्ध असलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन त्या आपल्या गावात प्रभावीपणे राबवाव्यात, असेही आवाहन करण्यात आले.

यावेळी ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे, पेसा व्यवस्थापक बन्या बापू सहाणे, स्वच्छ भारत समूह समन्वयक अशोक कडलग, पेसा अध्यक्ष काळू भांगरे, सोमनाथ भांगरे, राजू भांगरे, पांडुरंग भांगरे, सीआरपी कावेरी भांगरे, अंगणवाडी सेविका अलका भांगरे तसेच गावातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी गोरख भांगरे यांनी आभार मानले.

## खोटी पाठ थोपटून घेणाऱ्यांना आमचे कामातून उत्तर

### वैशाली वाजे । कोपरगाव शहरातील ब्रिजलालनगर परिसरातील पाण्याची टाकी व पाईपलाईनची यशस्वी चाचणी

**● कोपरगाव । वीरभूमी –**
युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आता थांबायचं नाही या विचाराने संपूर्ण शहराचा विकास सुरू आहे. गेल्या चार ते साडेचार वर्षांपासून प्रशासक काळात बंद पडलेली कामे आता पुन्हा मोठ्या जोमात सुरू करत आहोत. मोठ्या जल्लोषात लोकप्रतिनिधी यांनी दोन वर्षांपूर्वी पाच नंबर साठवण तलावाचे उद्घाटन केले होते. प्रत्यक्षात त्या योजनेचे पाणी शहराला अद्यापही मिळालेले नाही. पाण्याच्या टाक्याही तयार होत्या, परंतु प्रशासन किंवा लोकप्रतिनिधिंना त्या सुरू करण्यामध्ये कुठलाही रस नव्हता. मात्र सत्तांतर झाल्यानंतर ही सर्व कामे सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले, नगराध्यक्ष पराग संधान व सर्व नगरसेवकांनी विविध कामांना गती दिली. विरोधकांनी मात्र केवळ आजवर खोटी पाठ थोपटून घेण्यात रस होता हे सिद्ध झाले आहे कारण आम्ही काम करून जनतेला चांगले पाणी देण्याचा यशस्वी प्रयत्न करतो आहे हे शहराने पाहिले आहे अशी प्रतिक्रिया पाणीपुरवठा सभापती वैशालीताई वाजे यांनी दिली आहे.



कोपरगाव शहरातील ब्रिजलाल नगर परिसरामध्ये अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या पाण्याच्या टाकी व पाईपलाईनची यशस्वी चाचणी नगराध्यक्ष पराग संधान यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी ११ एप्रिल रोजी पार पडली. यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव, पाणीपुरवठा सभापती वैशालीताई वाजे, मनोजशेठ अग्रवाल, राजेंद्र सोनवणे, अमोल अजमेरे, कैलास मंजूळ, रवींद्र कथले, संजय उदावंत, दत्तू पगारे, संतोष शिंदे, फिरोज पठाण, अविनाश पाठक, दीपक जपे, राहुल खरात, निसार शेख, कैलास सोमासे, शैलेश नागरे, महेश पवार, पंकज शिंदे, स्वराज सूर्यवंशी, गणेश कांदळकर, संदीप कडू तसेच ब्रिजलाल नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगराध्यक्ष पराग संधान पुढे म्हणाले की, पाणीपुरवठा समितीच्या सभापती वैशालीताई वाजे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही पाणीपुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करण्यात आला. त्याच प्रयत्नांच्या परिणामी आज ब्रिजलाल नगर भागातील पाण्याच्या टाकीचे मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. यामुळे येथील स्थानिक नागरिकांना नळजोडणीद्वारे पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच या उपक्रमासाठी ब्रिजलाल नगरचे सर्वेसर्वा मनोजशेठ अग्रवाल यांचे आम्ही कायम ऋणी आहोत. त्यांनी या पाण्याच्या टाकीसाठी दहा गुंठे जागा उपलब्ध करून देत मोठी मदत केली आहे. त्यामुळे ब्रिजलालनगर, जोशी नगर, श्रद्धानगरी, शंकरनगर, माधव नगर आणि बोरावके वस्ती या सर्व भागांतील नागरिकांना या नव्या पाण्याच्या टाकीमुळे चांगल्या दाबाने पाणी मिळणार आहे.

## जीएसटी सहाय्यक अधिकारीपदी निवडीबद्दल स्नेहल आहेर हिचा स्नेहलताताई कोल्हे यांच्या हस्ते सत्कार



**● कोपरगाव । वीरभूमी –**
लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कोपरगावची कन्या कु.स्नेहल अशोक आहेर हिने उत्कृष्ट यश संपादन करत जीएसटी सहाय्यक अधिकारी पदावर नुकतीच नियुक्ती मिळवली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कु. स्नेहल आहेर तसेच तिचे आई वडील यांचा मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

कोपरगाव तालुक्यातील रहिवासी असलेल्या स्नेहल आहेर हिने लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण कोपरगावकरांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी सत्कार सोहळ्यात काढले.

सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर स्नेहलने हा टप्पा गाठला असून तिच्या या प्रवासात वडील अशोक आहेर व आई यांचा खंबीर पाठिंबा लाभला. खडतर परिस्थितीतून मार्ग काढत तिने जीएसटी सहाय्यक अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले.यावेळी कु. स्नेहल आहेर हिचा सन्मान स्नेहलताताई कोल्हे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तसेच तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला येसगाव सोसायटीचे चेअरमन सचिनदादा कोल्हे, अतुल सुराळकर, किरण गायकवाड तसेच ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते.

## पाथर्डीतील पीएम श्री जि.प. शाळेत भरला 'आनंदी बाजार'

### चिमुकल्यांनी सांभाळली दुकाने । सुमारे ३५ हजार रुपयांची उलाढाल

**● पाथर्डी । वीरभूमी –**
शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान, आत्मविश्वास व स्वावलंबनाची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने शहरातील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा येथे आयोजित करण्यात आलेला 'आनंदी बाजार' हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे शाळेचा परिसर काही काळ गजबजलेल्या बाजारपेठेसारखा दिसत होता.

या आनंदी बाजारात विद्यार्थ्यांनी स्वतःच विविध प्रकारची दुकाने उभारली होती. भाजीपाला, फळे, घरगुती खाद्यपदार्थ, अल्पोपहार तसेच काही शैक्षणिक साहित्याची विक्री विद्यार्थ्यांनीच केली. लहानग्या विद्यार्थ्यांनी ग्राहकांना वस्तू विकताना किंमत सांगणे, सुट्टे पैसे देणे, नफा–तोटा मोजणे अशा व्यवहारिक बाबी आत्मविश्वासाने पार पाडल्या. त्यामुळे वर्गात शिकलेले गणित प्रत्यक्ष व्यवहारात कसे उपयोगी पडते याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.



या उपक्रमात पालक, ग्रामस्थ तसेच शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांकडून विविध वस्तू खरेदी केल्या. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. या 'आनंदी बाजार' उपक्रमात सुमारे ३० हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती शाळेकडून देण्यात आली.

या उपक्रमासाठी पाथर्डी केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ. सविता कुटे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नंदा तुपे, सुरेखा बडे मनिषा फटांगरे ज्योती जाधव भावना देवरे छाया चंदनशिव आदींनी पुढाकार घेतला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वस्तू खरेदी करून आर्थिक व्यवहाराची प्रत्यक्ष अनुभूती देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारकौशल्य, आर्थिक जाण आणि आत्मविश्वास वाढविणारा हा कौशल्याधिष्ठित उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पालक, ग्रामस्थ व केंद्रातील सहकारी शिक्षकांचे यावेळी शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच जीवनातील व्यवहाराचीही शिकवण मिळत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.